ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

• प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख २४ डिसेंबर, १९५२ | अंक ४९

## विविध माहिती

**नोकरकपातीमुळें झालेली बचत**—मद्रास सरकारनें धान्यावरील नियंत्रणें काढून टाकल्यानंतर नागरी पुरवठा खात्याच्या नोकर वर्गांत कपात केली होती. एकूण ४,४६४ नोकरांना कामावरून कमी करण्यांत आलें आणि त्यामुळें ५२.७५ लाख रुपयांची सरकारची बचत झाली आहे, असें सांगण्यांत आलें.

**खादीच्या किंमती कमी केल्या**—मद्रास राज्यांत खादीनिर्मितीचीं ९ केंद्रें आहेत. ह्या केंद्रांतून तयार करण्यांत आलेल्या खादीच्या किंमती सुमारें २० टक्क्यांनीं कमी करण्यांत आल्या आहेत. ही खादी आतां जत्रांतून आणि प्रदर्शनांतून विक्रीसाठी ठेवण्यांत येणार आहे.

**सयामकडून मिळणारा तांदूळ**—भारतानें सयामकडे १ लक्ष, २० हजार टन तांदुळाची मागणी केली होती. इतका तांदूळ पुरविणें सयाम सरकारला शक्य नसल्यानें त्या सरकारनें फक्त १० हजार टन तांदूळ पुरविण्याचें मान्य केलें आहे.

**मुंबई राज्यांतील रेडिओंची संख्या**—गेल्या वर्षी परवानगी घेतलेले १,८२,००० रेडिओ सेट्स होते. चालू वर्षी ही संख्या २,००,००० पर्यंत वाढली आहे. व्यापारी संस्थांचे व प्रायोगिक सेट्हि वरील संख्येंत धरण्यांत आले आहेत. गेल्या वर्षी अशा रेडिओंची संख्या १०,००० होती; ती आतां १५,००० आहे.

**बोटींच्या वहातुकीपासून होणारें उत्पन्न**—भारतीय बोटींनीं वहातुकीच्या व्यवसायांत गेल्या कांहीं वर्षांत चांगली प्रगति केल्याचें दिसून येतें. १९४५ सालीं परदेशाकडील वहातुक करणाऱ्या हिंदी बोटींचें उत्पन्न शून्य रुपये होतें. १९५२ सालीं परदेशीय वहातुक करून हिंदी कंपन्यांनीं ८ कोटी रुपये मिळविले आहेत; त्याचप्रमाणें किनाऱ्यालगतची उतारूंची आणि मालाची वहातुक करण्यांतहि चांगलें यश मिळविलेलें आहे. १९४५ सालीं किनाऱ्या नजिकच्या वाहतुकीपासून ३.२ कोटी रुपयांचें उत्पन्न झालें होतें; १९५२ सालीं त्यापासून १०.४५ कोटी रुपये उत्पन्न झालें.

**छोट्या पाटबंधाऱ्यांवरील खर्च**—१९४७–४८ सालीं भारतीय सरकारनें छोटया पाटबंधाऱ्यांच्या कामावर १.१० कोटी रुपये खर्च केले होते. १९५०–५१ सालीं १२.८५ कोटी रुपये खर्च करण्यांत आले.

**अभ्रकाची निर्यात**—१९४७–४८ सालीं भारतानें ५.६५ कोटी रुपये किंमतीचें २,५५,२५९ हंड्रेडवेट अभ्रक निर्यात केलें होतें. १९५१–५२ सालीं १३.२० कोटी रुपयांचें ४,०८,०९६ हंड्रेडवेट अभ्रक निर्यात करण्यांत आलें.

**घरें बांधण्यास आर्थिक मदत**—औद्योगिक शहरांत घरें बांधण्यास मदत देण्याचें मध्यवर्ती सरकारचें धोरण आहे. त्या धोरणाप्रमाणें १९५२–५३ सालीं एक-एक खोल्यांचीं २८,५०० घरें बांधण्यांत यावयाचीं आहेत. त्यांपैकी कांहीं घरें एकमजली आणि कांहीं दुमजली असतील.

**कासीम रझवीवरील खटल्याचा खर्च**—हैद्राबादमधील रझाकारांचा पुढारी कासीम रझवी ह्याच्यावर भरण्यांत आलेल्या खटल्यापायीं राज्य-सरकारला १९,५०,००० रुपये खर्च आला. ह्या खर्चांत लायकअली सरकारमधील मंत्र्यांवर भरण्यांत आलेल्या खटल्यांचा खर्चहि समाविष्ट आहे.

**मोटार वळविण्यासाठीं 'टर्न टेबल'**—रेल्वेच्या इंजनांचें तोंड फिरविण्यासाठीं 'टर्न टेबल' असतें, हें पुष्कळांना ठाऊक आहे. लंडनमधील कित्येक मोठ्या इमारतींत मोटारींचीं तोंडें वळविण्यासाठीं टर्न टेबलची योजना करण्यांत आली आहे. वहातुकीच्या गर्दीमुळें रस्त्यांत मोटार रिव्हर्स करणें किंवा वळविणें शक्य होत नाहीं. टर्न टेबलाच्या योजनेमुळें ती सोय सहज होऊं शकते.

**कलकत्ता येथील सामन्याचें उत्पन्न**—भारत व पाकिस्तान ह्यांच्या दरम्यान कलकत्ता येथें झालेल्या पांचव्या कसोटी सामन्याचें गल्ल्याचें उत्पन्न सुमारें २,४०,००० रुपये झालें. ४ दिवसांत मिळून ९५,००० प्रेक्षकांनीं खेळ पाहिला. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला इंडिअन क्रिकेटबोर्डानें एकूण १,२५,००० रुपये सर्व खर्चासाठी म्हणून दिले.

**ब्रिटनला इराकमधील नैसर्गिक गॅस**—इराकमध्यें नैसर्गिक गॅसचा पुरवठा विपुल आहे. इराकमधून ब्रिटनपर्यंत २,५०० मैल लांबीचे नळ टाकून ह्या गॅसचा पुरवठा करण्याची योजना एका अमेरिकन एंजिनिअरनें तयार केली आहे. ह्या कामाला १४ कोटी पौंड भांडवली खर्च आणि १.१ कोटी पौंड वार्षिक खर्च येईल. ब्रिटनमध्यें सध्यां पुरविण्यांत येणाऱ्या गॅसपेक्षा इराकमधील गॅसला बराच कमी खर्च येईल.

**पुढील निवडणूक कम्युनिस्ट जिंकतील ?**—कम्युनिझमच्या प्रचाराला तोंड द्यावयाचें असेल तर अमेरिकेनें 'लोकशाही'ची जाहिरात वस्तऱ्यांच्या पाती व दारू ह्यांच्या जाहिराती इतकी व्यवस्थित केली पाहिजे, असे उद्गार मि. टॉवेक ह्या अमेरिकन मिशनऱ्यानें काढले आहेत. भारतामधील पुढील सार्वत्रिक निवडणुकींत कम्युनिस्ट निवडून येण्याची शक्यता ५० टक्के तरी आहे, असा इशाराहि त्यांनीं दिला आहे.

### वाया जाणाऱ्या रेशमाचा उपयोग

प. बंगालमधील रेशमाच्या सुताच्या गिरण्यांमधून बरेचसें रेशीम वाया जातें. त्या रेशमाचा उपयोग करून घेण्यासाठी प. बंगाल सरकारनें एक खास चरखा तयार करवून घेतला आहे. चरख्यावर सूत काढण्यासाठी शिकावें लागतें. प. बंगाल सरकारच्या उद्योग खात्यानें हें शिक्षण देण्यासाठी मालडा, नादिआ, मुर्शिदाबाद व हौरा ह्या ठिकाणीं केंद्रें काढलीं आहेत. केंद्रांतून ३०० निर्वासित स्त्रियांना आतांपर्यंत चरखे वापरण्याचें शिक्षण देण्यांत आलें आहे. निर्वासितांना वरील चरखे सोयीच्या हप्त्यांनीं प्रथम भाड्यानें व नंतर कायमचे विकण्यांत येतात. दररोज चार तास काम केलें तर प्रत्येक चरखेवाला दरमहिना २५ रुपये मिळवूं शकतो. व्यापारी गोटांचें म्हणणें असें आहे कीं ह्या व्यवसायाच्या विस्ताराला पं. बंगालमध्यें बराच वाव आहे. कारण, प. बंगालमधून दरवर्षी सुमारें २,५०,००० पौंड वाया गेलेलें रेशीम इटलीला निर्यात करण्यांत येतें. ह्या निर्यातींत स्विटझरलंड आणि फ्रान्स ह्यांचाहि वाटा आहे. रेशीम वरील देशांतील गिरण्यांतून गेल्यावर तेथें त्याचा पुन्हा धागा बनविण्यांत येतो अगर इतर माल बनविला जातो, आणि नंतर तो भारतांत पुन्हा निर्यात केला जातो. वाया गेलेल्या रेशमाची किंमत मूळ उत्पादकाला मिळते खरी; पण ती अत्यल्प म्हणजे अवघी २॥ लाख रुपये असते. उलट पक्षीं, ह्याच कच्च्या मालाचा उपयोग करून रेशमाचा धागा व अगर इतर बनविलेला माल भारतांत आला म्हणजे त्यासाठी मात्र ३० लाख रुपये द्यावे लागतात. बंगालमधील कच्च्या मालाचा उपयोग तेथेंच करण्यांत आला तर निदान २,००० माणसांना तरी काम मिळेल असा अंदाज करण्यांत आला आहे. सध्या अशी परिस्थिति आहे कीं संघटनेचा व विकास केंद्रांचा अभाव असल्यामुळें उपलब्ध असलेल्या कच्च्या मालापैकीं एक टक्का मालाचासुद्धां राज्यांत उपयोग करतां येत नाहीं. त्यामुळें तो निर्यात करण्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं.

---

### ब्रिटिश उद्योगधंद्यांच्या भवितव्याविषयीं चिंता

ब्रिटनचे उद्योगधंदे जो माल परदेशीं निर्यात करतात त्या मालाला आतां इतर देशांच्या मालाची जोरदार स्पर्धा होऊं लागल्यामुळें ब्रिटनमध्यें चिंतेचें वातावरण पसरलें आहे. ही स्पर्धा अशीच चालू राहिली तर एक प्रकारचें व्यापारी युद्ध सुरू झालें, असाच त्याचा अर्थ होईल. इतर स्पर्धक देश ब्रिटनच्या मालापेक्षा स्वस्त दरानें माल देतात एवढेंच कांहीं काळजीचें कारण नाहीं. किंमत देण्याच्या बाबतींत अधिक सवलतीही परदेशी कारखानदारांकडून गिऱ्हाइकाला मिळत आहेत. विशेषतः एंजिनिअरिंगच्या कारखान्यांना परदेशांची स्पर्धा बाधत आहे. ब्रिटिश कारखानदारांना मागें टाकून ह्या कारखान्यांसाठी लक्षावधि पौंडांच्या मागण्या नोंदून घेतल्या आहेत. ब्रिटिश सरकार आणि कारखानदार ह्या परिस्थितीवर नाना प्रकारचे उपाय सुचवीत आहेत. त्या सर्वांचा उद्देश असा आहे कीं, एंजिनिअरिंगच्या धंद्याबाबत एखादा आंतरराष्ट्रीय करार करण्यांत येऊन कोणत्याही प्रकारचें व्यापारी युद्ध होऊं नये. पोलादाच्या मालाची निर्यात अजून मोठ्या प्रमाणावर होत नाहीं तरी पण न्यूझीलंडमधील एका मोठ्या पुलाच्या सामानाचें कंत्राट दोन ब्रिटिश कारखान्यांना मिळालें आहे. ब्रिटनमधील बोटी बांधण्याचा धंदा चांगला भरभराटींत आहे. १९५३च्या प्रारंभीं ह्या धंद्याला करावयाच्या पोलादाच्या पुरवठ्यांत ९ टक्के वाढ करण्याचें ब्रिटिश सरकारनें ठरविलें आहे. तथापि वाढलेला पोलादाचा पुरवठाहि नोंद केलेल्या मागण्या पुरविण्यास अपुराच पडेल. नव्या मागण्या सारख्या येत असल्यामुळें बोट बांधण्याच्या गोद्यांना तीन ते चार वर्षे तरी काम सहज पुरेल. जपान व जर्मनी ह्यांच्यावरील बोटी बांधण्यासंबंधींचीं नियंत्रणें आतां काढून टाकण्यांत आलीं आहेत. युरोपमधील बोटी बांधण्याच्या गोद्याहि आतां पुन्हा नव्यानें बांधण्यांत आल्या आहेत. त्यामुळें ब्रिटनच्या ह्या धंद्यालाही जोराची स्पर्धा होणार असा रंग दिसत आहे.

---

### ब्रिटनचा मोटारींचा धंदा

ब्रिटनमधील मोटारींच्या विक्रेत्यांना कारखान्यांकडून दर आठवड्याला सुमारे ४,००० गाड्या मिळतात. चालू वर्षी आतांपर्यंत १,३५,००० गाड्या तेथील बाजारांत आल्या आहेत. गेल्या सबंध वर्षांत १,१०,००० गाड्या ब्रिटनच्या घरच्या बाजारपेठांत आल्या होत्या. बाजारांत गाड्या जास्त आल्या असल्या तरी करांसकट ८५० पौंडांपेक्षा अधिक किंमत असलेल्या गाड्यांना फारसें गिऱ्हाईक मिळत नाहीं. उलटपक्षीं, ८ ते १० हॉर्स पॉवर्सच्या स्वस्त गाड्यांना मात्र एकसारखी मागणी आहे. ह्या गाड्या म्हणजे मुख्यतः मॉरिस मायनर, ऑस्टिन, हिलमन मिंक्स व फोर्ड फिफेक्ट ह्या होत. परदेशी बाजारपेठांत ब्रिटिश मोटारगाड्या खपण्याचें प्रमाण बरेंच कमी झाल्यानें ब्रिटनच्या घरच्या बाजारपेठेला त्यांचा पुरवठा अधिक होऊं लागला आहे. ब्रिटनमध्यें सध्यां युद्धापूर्वीच्या १६,००,००० मोटारगाड्या वापरांत आहेत. गाड्यांवरील कर कमी होण्याची अगर रद्द होण्याची वाट हजारों गिऱ्हाइकें पहात आहेत. पार्लमेंटमध्यें खरेदी करासंबंधीं प्रश्न विचारण्यांत आला असतो ब्रिटनचे अर्थमंत्री मि. बटलर ह्यांनीं स्पष्टपणें कांहींच सांगितलें नाहीं. ह्यासंबंधी 'डेली एक्स्प्रेस' ह्या वृत्तपत्रानें 'अहो, कांहींतरी बोला' ह्या शीर्षकाखालीं एक अग्रलेख लिहिला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, अर्थमंत्र्यांच्या संदिग्ध धोरणामुळें कॉव्हेंट्री–बर्मिंगहॅम ह्यासारख्या मोटारी तयार करणाऱ्या शहरांतून निराशेचें वातावरण पसरलें आहे. मोटारी घेणाऱ्या गिऱ्हाइकाला करासंबंधीं नवीन धोरण जाहीर होईपर्यंत, म्हणजे पुढील एप्रिलपर्यंत, दम धरणें शक्य आहे. पण मोटारींच्या कारखान्यांतून काम करणाऱ्या कामगाराला ही अनिश्चिति अधिक जाणवत आहे.

---

### भारतांतील लोकसंख्येचा शेतजमिनीवर ताण

भारतांत लागवडीच्या क्षेत्राचें प्रमाण दरमाणशीं ०·७८ एकर पडतें. प्रादेशिक दृष्ट्या पाहतां द्वीपकल्पीय डोंगराळ विभाग आणि पठारी प्रदेश यांचे बाबतींत हें प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे १·२२ एकर असून त्याखालोखाल हिमालयीन प्रदेश ०·७४ एकर, पश्चिम घाट आणि किनाऱ्यालगतचा विभाग ०·६४ एकर, उत्तरेकडील सपाट विभाग ०·६२ एकर असें असून, पूर्व घाट आणि किनाऱ्यालगतचा प्रदेश यांत सर्वांत कमी म्हणजे ०·४८ एकर असें आहे. भारतांत एकूण २६,८४,२८,९६४ एकर जमीन लागवडीखालीं असून त्यापैकीं ३,५९,४९,९३८ एकर जमिनींत एकापेक्षा अधिक वेळ लागवड करण्यांत येते. लागवडीखालील एकूण जमिनींपैकीं तांदूळ व गहूं याखालील क्षेत्रांचें प्रमाण अनुक्रमें २६ व ११·९ टक्के असून इतर पिकांचें प्रमाण पुढीलप्रमाणें आहे. ज्वारी, बाजरी व रागी २३·२ टक्के, मका, हरभरा आणि डाळी धरून इतर अन्नधान्यें २७·२ टक्के, अन्नधान्यें व गळित धान्यें सोडून इतर अन्नपिकें ५ टक्के, गळित धान्यें ९·१ टक्के, वैरण ४·२ टक्के, कापूस ४·५ टक्के, ताग आणि इतर तंतूमय पिकें ०·८ टक्का, चहा, कॉफी, तंबाखू आणि इतर किरकोळ पिकें १·५ टक्का.

# अर्थ

बुधवार, ता. २४ डिसेंबर, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंदी चहाच्या धंद्याची अवस्था

हिंदी चहाचा धंदा सध्या बिकट परिस्थितींत सांपडला आहे आणि त्याला अडचणींतून बाहेर काढण्यासाठी अनेक उपाय-योजना सुचविण्यांत येत आहेत. हिंदी चहाच्या धंद्यांत जितक्या लोकांना काम मिळतें, तितकें दुसऱ्या कोणत्याहि हिंदी धंद्यांत मिळत नाहीं आणि निर्गत होणाऱ्या जिनसांत चहाचा अनुक्रम पहिल्या तीनमध्यें येतो.

१९३३ मध्यें, मंदीच्या कटु अनुभवानंतर, चहाचें उत्पादन करणाऱ्या प्रमुख देशांनीं उत्पादन नियंत्रित करून नवी लागवड कमी करण्याचें ठरविलें. युद्धकाळांत हिंदी व सिलोनीं चहास परदेशी बाजारपेठांत मागणी खूपच वाढली, कारण इंडोनेशिया जपानचे ताब्यांत गेला आणि चीन व फोर्मोसा ह्यांचीहि निर्गत कमी झाली. १९५०–५१ पर्यंत ही चलती टिकून राहिली. दर मजुरामागें दरसाल ७०० पौंड चहा गोळा होतो, ह्या हिशेबानें भारत, सिलोन व पाकिस्तान ह्या तीन देशांत चहाच्या मळ्यांतील मजुरांची संख्या पांच लाखांनीं वाढली असली पाहिजे, असा हिशेब होतो. इतर देशांतील चहाचें उत्पादन सुधारलें कीं त्याचा हिंदी मळ्यांवर दुष्परिणाम होणें स्वाभाविकच होतें.

लंडन येथें स्थापलेल्या इंटरनॅशनल टी मार्केट एक्सपान्शन बोर्डाकडे, परदेशांत चहाचा प्रचार करण्याचें काम भारत, सिलोन व इंडोनेशिया ह्यांनीं संयुक्तपणें १९३५ पासून सोंपाविलेलें होतें. परंतु, त्या वेळेच्या मानानें आतां परिस्थिति पालटली आहे, आणि भारत सरकारनें आपलें अंग काढून घेतलें आहे, तें चहाचा खप वाढविण्यास सहाय्यकारक कसें ठरेल, हा प्रश्नच आहे. चहाचा खप भारतांतच वाढविण्यास पुष्कळच वाव आहे, तरी परदेशांतील प्रचार सध्याच्या चढाओढीच्या काळांत अधिक प्रभावी होणें अगत्याचें आहे. हिंदी चहाचा दर्जा उत्कृष्ट असल्याचें कित्येक देशांत अद्याप माहितीहि नाहीं. तर मग त्याचा तेथें खप कसा वाढणार ? अमेरिकेंत चांगल्या दर्जाचा महाग चहा खपण्याजोगी तेथील लोकांची आर्थिक परिस्थिति आहे, पण तेथें चहाचा प्रचार करणेंहि अवघड आहे. वृत्तपत्रांतील जाहिरातींचे दर तेथें अतिशयच भारी आहेत आणि अनेक प्रतिस्पर्धी जिनसांशीं हिंदी चहास टक्कर द्यावी लागेल. त्यासाठी दूरगामी योजनेची आवश्यकता आहे.

निर्गतीच्या दूरगामी योजना बाजूस ठेवल्या, तरी हिंदी चहापुढील तातडीचे प्रश्न कमी महत्त्वाचे नाहींत. जागतिक उत्पादनांत वाढ, उतरत चाललेल्या किंमती आणि त्या किंमतींच्या मानानें उत्पादन खर्च व कर ह्यांचा मेळ न बसण्याची वाढती प्रवृत्ति, ह्यांमुळें इतर कांहीं जिनसांप्रमाणें चहासहि कठीण काळ आला आहे. १९३८ मध्यें भारतानें सुमारें ४५ कोटी पौंड चहा तयार केला; १९५१ मध्यें तो आकडा ६० कोटी पौंडांवर गेला; ह्याच मुदतींत सिलोनचें चहाचें उत्पादन २५ कोटी पौंडांचें ३० कोटी पौंड झालें. परंतु आतां, ह्या उत्पादनाचा उठाव होणें कठीण झालें आहे. इंडोनेशिआचा चहा जागतिक बाजारांत आला आहे, जपान आणि फोर्मोसा हांहे त्याच मार्गावर आहेत आणि दोन-अडीच कोटी पौंड घेणारा इराण पांच वर्षांचे अवधींत हिंदी चहाची आयात जवळजवळ बंदच करील असें लक्षण आहे. मलाया, रशिया, टर्की, मोझांबिक, मॉरिशस, बेल्जम काँगो, ब्राझील, अर्जेंटिना, हे देश चहाची लागवड वाढवीत आहेत. चालू वर्षी चहाचें जागतिक उत्पादन त्याच्या उठावापेक्षा ५ कोटी पौंड ज्यास्त भरेल, असा अंदाज आहे. खालील तक्त्यांत चहाची किंमत कशी उतरत चालली आहे, त्याचे तुलनात्मक आकडे दिले आहेत. १९५०, १९५१ व १९५२ च्या नोव्हेंबर मधील कलकत्ता येथील पहिल्या लिलावांत मिळालेल्या त्या किंमती आहेत.

| चहाचा प्रकार | १९५० रु. आ. पै | १९५१ रु. आ. पै | १९५२ रु. आ. पै |
|---|---|---|---|
| आसाम | २—२–० | २—२–८ | १–१०–५ |
| काचर | १–१२–५ | १–१०–८ | ०–१२–७ |
| दार्जिलिंग | २—४–८ | २—४–२ | १–१२–८ |
| डूर्स | १–१२–२ | १–११–३ | १— ०–८ |
| तेराई | १–१२–८ | १–१०–९ | १—१–१ |
| त्रिपुरा | १–१०–८ | १—९–२ | ०–१३–९ |

युद्धकाळांत मळ्यांमध्यें वाढ झाली, ती शिस्तबद्ध झालेली नाहीं. युरोपियन मालकीचे मळे हिंदी मालकीचे झाले, त्यावेळीं चहाच्या उत्पादनाचें मार्गदर्शन करणारे व्यवस्थापक स्वतः तज्ज्ञ नव्हते आणि कामगारांच्याकडून चांगल्या दर्जाचें काम मिळेनासें झालें. उत्पादनाचा खर्च निर्गतीस मिळणाऱ्या किंमतीपेक्षा जास्त येऊं लागला. उत्पादन खर्चापैकी ९०% खर्चावर धंदा करणारांचें नियंत्रण चालू शकत नाहीं,* त्या कारणानें बाजारभाव घसरले तरी उत्पादन खर्चांत काटकसर करणें अशक्य झालें आहे. कामगारांना द्याव्या लागणाऱ्या रोजगाराबरोबर इतरहि मार्गांनीं त्यांचेसाठी मळेवाल्यांना खर्च करावा लागतो आणि हा खर्च वाढत्या प्रमाणावर आहे. मळेवाल्यांप्रमाणें स्वतःचा ऊंस करणाऱ्या साखर कारखानदारांनाहि हाच प्रश्न सोडवावा लागणार आहे. चहाच्या धंद्यांतील मजुरीचें एकूण उत्पादन खर्चाशीं प्रमाण १९४६ सालीं ४४·७६% होतें, तें १९५१ मध्यें ५६·६२% झालें आहे. चहाचा दर्जा उतरला आहे, करांचा बोजा वाढला आहे, वहातुकीच्या अडचणी कमी झालेल्या नाहींत, ज्या खोक्यांतून चहा पाठवितात तीं मोडलेल्या स्थितींत परदेशीं पोंचतात, इत्यादि अनेक गोष्टींमुळें चहाच्या धंद्याची स्थिति बिघडली आहे. चहाच्या धंद्यास दीर्घ मुदतीचीं कर्जें दिल्यानें केवळ तो धंदा किफायतशीर होईल असें सांगतां येत नाहीं.

* युनायटेड कमर्शिअल बँक लि., कलकत्ता. 'टी लेटर,' डिसेंबर, १९५२

### हिंदी धंद्यांतील परदेशी भांडवल

३० जून, १९४८ अखेरच्या सर्वांत ताज्या उपलब्ध आकड्यां-प्रमाणें वेगवेगळ्या हिंदी धंद्यांतील परदेशी वसूल भांडवलाचा हिस्सा खालीं दिला आहे.

| | परदेशी वसूल भांडवल (कोटी रु.) | हिंदी वसूल भांडवल (कोटी रु.) |
|---|---|---|
| तागाच्या गिरण्या | ७·४७ | २२·१० |
| कपास गिरण्या | ५·८१ | ६१·७८ |
| आगबोट वहातूक | ४४·९३ | ८·५१ |
| चहाचे मळे | ३९·५४ | १२·९५ |
| कोळसा खाणी | २·०३ | १३·४० |

परदेशी भांडवलाचें हिंदी भांडवलाशीं प्रमाण ताग ३३%, कपास गिरण्या ९%, शिपिंग ५२८%, चहाचे मळे ३०५%, कोळसा खाणी १५%, असें पडतें.

### चहाच्या मळ्यांत बांगड्यांना बंदी

सिलोनमधील चहाच्या कांहीं मळेकऱ्यांनीं मळ्यांतील कामकरी स्त्रियांना हातांत कांचेच्या बांगड्या घालून काम करण्यास बंदी केली आहे. भंगलेल्या बांगड्यांचे तुकडे चहांत मिसळले गेले, तर गिऱ्हाइकांना तें फार बाधक होईल असें त्यांचें म्हणणें आहे. वर्षानुवर्ष कामकरी स्त्रिया कांचेच्या बांगड्या वापरीत आल्या आहेत आणि आतांच का त्यांना बंदी केली जात आहे, अशी त्यांची तक्रार आहे.

### राज्यारोहण समारंभास अवकाश, पण दारूच्या कंपनीचे शेअर्स महागले

स्टीफन स्मिथ ह्या दारूविक्री करणाऱ्या ब्रिटिश कंपनीच्या ५ शिलिंग किंमतीच्या शेअर्सची किंमत आतां ३ ते ४ शिलिंगांनीं वाढली आहे. एलिझाबेथच्या राज्यारोहण समारंभाच्या वेळच्या चलतींचें हें आधींच दिसूं लागलेलें चिन्ह आहे.

### सरकारी नोकरांना चार बायकांचा प्रवास भत्ता मिळणार

पाकिस्तानांतील सरकारी अधिकाऱ्यांना इतके दिवस फक्त एकाच बायकोचा प्रवास भत्ता मिळत असे. आतां चार बायकांचा प्रवास भत्ता त्यांना मागतां येईल, अशी नियमांत दुरुस्ती करण्यांत आली आहे. मुस्लिम कायद्याप्रमाणें पुरुषास चार बायका करतां येतात.

### खेळांमुळें पश्चिम व पूर्व जर्मनी ह्यांची एकी

पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी ह्यांतील क्रीडा-संस्थांनीं दोन्ही विभागांतील संघांचे सामने भरविण्यास प्रारंभ केला आहे. चालू वर्षी हेलसिंकी येथें आंतरराष्ट्रीय सामने झाले, त्यासाठी फक्त प. जर्मनींतील खेळाडूंची निवड करण्यांत आली होती. येत्या आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी दोन्ही विभागांचे संयुक्त संघ जाऊं शकतील. पश्चिम विभागांतील वृत्तपत्रांना ही घटना विशेष पसंत नाहीं, परंतु कम्युनिस्ट वृत्तपत्रांनीं तिचें हार्दिक स्वागत केलें आहे.

### कच्छड टाइपरायटर

म्हैसूर सरकारनें कन्नड टाइपरायटर तयार करवून घेतले असून ते दोन-तीन महिन्यांत बाजारांत मिळूं लागतील, असें म्हैसूरच्या शिक्षणमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे.

### बाजारांतील मालाच्या तुटवड्यावर उपाय

स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें पाकिस्तानांतील शेड्यूल्ड बँकांना जीं कर्जें दिलेलीं आहेत, तीं स्टेट बँक तात्काळ परत मागण्याच्या विचारांत आहे. शेड्यूल्ड बँकांकडून कर्जें परत मागितलीं म्हणजे त्या बँका त्यांच्या कर्जदारांकडे "पैसे भरून माल सोडवा" असा तगादा लावतील, त्यामुळें लोकांना हव्या असलेल्या जिनसा बाजारांत येतील, असा युक्तिवाद करण्यांत येत आहे. असें करणें कितपत श्रेयस्कर होईल, ह्याविषयीं छाननी केल्यावरच हुकूम काढण्यांत येईल.

### हिंदी लष्करांतील परदेशी अधिकारी

| वर्ष | संख्या |
|---|---|
| १९४८ | ४१६ |
| १९४९ | १९४ |
| १९५० | १७८ |
| १९५१ | ११३ |
| १९५२ | ७७ |

### "ग्लुको कोला" विरुद्ध "कोको कोला"

मेसर्स पार्ले बॉटलिंग लि. नें त्यांच्या पेयाचें "ग्लुको कोला" हें नांव रजिस्टर करण्यासाठीं अर्ज केला, त्यास "कोको कोला" विकणाऱ्या मेसर्स प्युअर ड्रिंक्स लि. ह्या अमेरिकन फर्मचा विरोध आहे. त्याबाबत रजिस्ट्रार ऑफ ट्रेड मार्क्ससमोर वाद चालू आहे. "ग्लुको कोला" ह्या नांवाच्या रजिस्ट्रेशनमुळें घोटाळा होईल, ह्या मुद्यास "ग्लुको कोला" च्या कारखानदाराचें उत्तर असें आहे, कीं "कोला" हें अनेक पेयांस नांव दिलें जातें; तो शब्द वगळला तर "ग्लुको" आणि "कोला" ह्या शब्दांत साम्य मुळींच नाहीं; तेव्हां घोटाळा होण्याचें कारण नाहीं. दोन्ही कंपन्यांनीं इंग्रज वकील दिले आहेत.

### हायकोर्टाचा को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलला हुकूम

मुघट खान हुबळी को-ऑपरेटिव्ह इरिगेशन सोसायटी स्थापण्याच्या कामीं श्री. आनंदीमठ ह्यांनीं पुढाकार घेतला होता, आणि त्यांना सोसायटी १०० रु. ऑनरेरियम देत होती. काटकसरीचा एक भाग म्हणून, सोसायटीनें ठराव करून हा तनखा बंद केला. श्री. आनंदीमठ ह्यांनीं कॉ-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलकडे अपील केलें तेव्हां त्यांची नेमणूकच चुकीची होती, असा मुद्दा सोसायटीनें मांडला, आणि असिस्टंट रजिस्ट्रारकडून कागदपत्र मागविण्याची ट्रायब्यूनलला विनंती केली. कागदपत्र न मागवितांच ट्रायब्यूनलनें निवाडा करून श्री. आनंदीमठ अजून नोकरींत असल्याचें ठरविलें. तेव्हां सोसायटीनें हायकोर्टाकडे अपील केलें. कागदपत्र मागविणें अगदी सोपें असतांहि ट्रायब्यूनलनें तें केलें नाहीं, त्यामुळें न्यायांत अडथळा आला असें ठरवून आणि घटना-कायद्याच्या २२७ व्या कलमाप्रमाणें हायकोर्टास मध्यें पडण्याचा अधिकार आहे असें सांगून अपील मंजूर केलें. आतां कागदपत्र मागवून व त्याचा विचार करून ट्रायब्यूनल फेर-निवाडा करील.

### शेतकी पदवीधरांना डे. कलेक्टरच्या जागा ?

शेतकी कॉलेजें अधिक आकर्षक करण्यासाठी शेतकी कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांस डेप्युटी कलेक्टरांच्या जागा देण्याची योजना मुंबई राज्याचे महसूलमंत्रि श्री. हिरे ह्यांच्या विचारांत आहे. धारवाडच्या सरकारी शेती कॉलेजाच्या वार्षिक संमेलनाचे प्रसंगीं त्यांनीं ह्या योजनेचा उल्लेख केला. त्या कॉलेजावर ६० लक्ष रुपये खर्च झाले आहेत, पण त्यांत फक्त ९५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

## बँकिंग प्रदर्शन

(ले. : नि. ना. क्षीरसागर, मॅ. डायरेक्टर, भारत इं. बँक लि. पुणें)

पूना बँकिंग असोसिएशन व डेक्कन बँक्स असोसिएशननें, पुणें या दोन संस्थांचे पुरस्कारानें पुणें येथें नोव्हेंबर ३० व डिसेंबर १ या दोन्ही दिवशीं पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेचे इमारतींत 'बँकिंग प्रदर्शन' भरविण्यांत आलें होतें. या तऱ्हेच्या प्रदर्शनाची अभिनव कल्पना पूना बँकिंग असोसिएशनचे उत्साही कार्यवाह श्री. बापूसाहेब गांडेकर यांनीं असोसिएशनच्या लोणावळा–खंडाळा सहलीचे वेळीं मांडली व त्यांनीं ती यशस्वी करून दाखविली. अशा पद्धतीचें प्रदर्शन मुंबई प्रांतांत किंबहुना भारतांत हें प्रथमच भरत असल्यानें या प्रदर्शनाकडे जनतेची औत्सुक्यपूर्ण दृष्टि असणें साहजिकच होतें. बँकिंगसारख्या रुक्ष व आंकडेमोडीचे विषयांतहि कलाकुशलतेची भर घालून तो विषयहि सामान्य जनतेस शैक्षणिक दृष्ट्या कसा सहज सुलभ करून दाखवितां येतो, हें ज्यांनीं प्रदर्शनास भेट देऊन त्यांतील अनेक विभागांची माहिती घेतली असेल त्यांचे लक्षांत आलेंच असेल.

या नवीन उपक्रमास डेक्कन बँक्स असोसिएशननेंहि पाठिंबा दिला. प्रदर्शनाचा हा कार्यक्रम कल्पनेपेक्षां जास्त यशस्वी रीतीनें पार पाडला याबद्दल दोन्ही संस्था अभिनंदनास पात्र आहेत.

बँकिंग प्रदर्शनाचें उद्घाटन रविवार ता. ३०, नोव्हेंबर १९५२ रोजीं दुपारीं ३ वाजतां 'इंडियन बँक्स असोसिएशन'चें अध्यक्ष श्री. प्राणलाल देवकरण नानजी यांचे हस्तें करण्यांत आलें. प्रदर्शनाचे मुख्य दरवाजाजवळ शेठ प्राणलाल यांच्या लेखांतील संदेशाची भव्य तसबीर प्रामुख्यानें दिसेल अशी लावण्यांत आली होती. शेठ प्राणलाल आपल्या संदेशांत म्हणतात:–

"बँकिंग ही सेवाप्रधान वृत्ति आहे. ती देशाची, तसेंच जनतेची सेवा करते. देशाच्या समृद्धीचा आधार बँकिंगच्या प्रवृत्तीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असतो."

### जाहिरात विभाग

या विभागांत देशी व परदेशी बँकांच्या जाहिरातींचीं कात्रणें बोर्डावर आकर्षक पद्धतीनें लाविलीं असल्यानें थोडक्या शब्दांत अथवा वाक्यांत परिणामकारक अशीं बँकांचीं वैशिष्ट्यें कशीं लिहितां येतात हें दिसून येत होतें. महाराष्ट्रांतील ४०–४५ व परदेशांतील ७–८ बँकांच्या जाहिरातींचे विशिष्ट प्रकारचे नमुने एकत्रित मांडल्यामुळें वेगवेगळ्या बँकांच्या जाहिरातींतील विविधता एकसमयावच्छेदेंकरून पाहावयास मिळत होती. बँकांच्या जाहिराती कमी खर्चांत, आकर्षक व अर्थपूर्ण कशा करतां येतात याची पूर्ण कल्पना या विभागांत येत होती.

### बँकांतील चेक्स्, ड्राफ्ट, वगैरे

बँकिंग व्यवसायांत चेक्स्, ड्राफ्ट, हुंड्या, यांना फार महत्त्व आहे. सुमारें २०० ते २५० पर्यंत देशी व परदेशी बँकांचे विविध रंगांत छापलेले चेक्स् बोर्डावर कलात्मक दृष्टि पुढें ठेवून लाविले असल्यामुळें तें दृश्य नयनमनोहर असें दिसत होतें. बँकांचे खातेदारांना 'चेक' ही एक आकर्षणाची बाब असते. या दृष्टीनें बँकांनीं आपली चेक्स्ची छपाई, त्याचें डिझाईन, त्याचा विशिष्ट प्रकारचा कागद, या सर्व गोष्टी तुलनात्मक दृष्टीनें पाहाण्याजोग्या होत्या. चेक लिहितांना खातेदारांच्या होणाऱ्या चुका, तसेंच बँकांचेकडून अनेक कारणानें परत जाणारे चेक्स्चे नमुनेहि स्वतंत्र बोर्डावर लावण्याची व्यवस्था झाल्यानें सर्वसाधारण माणसासहि चेक्स् परत का व कसे जातात याची कल्पना येणें शक्य झालें होतें.



शेठ प्राणलाल प्रदर्शनाची पहाणी करीत आहेत.

### स्टेशनरी

बँकांना लागणाऱ्या पेपर स्टेशनरीचा एक विभाग ठेवण्यांत आला होता. त्यांत इरा-फाईल्स्, साध्या फाईल्स्, पॅडस्, एनव्हलप्स्, वगैरेंचे नमुने मांडण्यांत आले होते.

### यांत्रिक विभाग

बँकांच्या व्यवहारांत दैनंदिन लागणारीं यंत्रें असोसिएटेड एजन्सीज् (पुणें) यांचेकडून मांडण्यांत आलीं होतीं. या प्रत्येक मशीनवर प्रत्यक्ष काम कसें होतें व त्याचा बँकांचे व्यवहारांत कसा उपयोग होतो व वेळेची बचत होऊन काम कसें फायदेशीर होतें, हें प्रात्यक्षिक दिसत असल्यामुळें हा विभाग प्रेक्षकांचे कुतुहलाचा विषयच होऊन बसला होता. पत्रें उघडण्याचें मशीन, पोस्टाचीं तिकिटें लावणेंचे ऐवजीं आपोआप तिकिटें छापून घेणेंचें फ्रॅंकिंग मशीन, बेरीज–वजाबाकी–गुणाकार–भागाकार करण्याचें कॅलक्युलेटर मशीन, कोणत्याहि एका प्रकारचें नाणें मोजण्यासाठीं वापरण्यांत येणारें कॉइन काऊंटर मशीन, मजकूर डिक्टेट करून तो रेकॉर्ड होऊन पुन्हां टाइपिंगकरितां ग्रामोफोनप्रमाणें ऐकूं येणारा 'डिक्टोफोन', अशा तऱ्हेचीं नवीन नवीन उपकरणें या विभागांत ठेवण्यांत आलीं होतीं.

### जुनीं व नवीं नाणीं

हा विभाग पुणें येथील सन्माननीय नागरिक श्री. बाळासाहेब नाईक यांनीं जातीनें लक्ष घालून मांडला होता. यांत त्यांनीं जुनीं–नवीं स्वतःची वेगवेगळ्या देशांतील व वेगवेगळ्या शतकांतील अशीं जमविलेलीं नाणीं आणि श्री. वामनराव वैद्य व श्री. वाय. डी. ओगले यांचे नाण्यांचे व नोटांचे नमुने, हे पाहात असतांना व्यवहारांत नाण्यांचे प्रचारांत कशीं कशीं स्थित्यंतरें होत गेलीं हें इतिहासाची आठवण करून देत होते.

### बँकिंग संबंधीं पुस्तकें, हस्तलिखितें

या पुस्तकांचे विभागांत पुण्यांतील कॉमर्स कॉलेज, डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, इत्यादि संस्थांनीं पुस्तकें ठेविलीं होतीं. कॉमर्स, इंडस्ट्री, अर्थ, वगैरे नियतकालिकांचे अंक तसेंच 'सुबोध बँकिंग' हें सौ. लीला काळे, सांगली यांचें हस्तलिखित मासिकहि प्रदर्शनांत मांडण्यांत आलें होतें.

### ग्राफ्स्

देशांतील जॉइंट स्टॉक बँका, सहकारी बँका, यांचे व्यवहार दर्शविणारे ग्राफ्स् रिझर्व्ह बँकेकडून प्रसिद्ध होत असतात. त्यांतील कांहीं ग्राफ्स् तसेंच को-ऑपरेटिव्ह ब्लॉक, बँकिंग इन् ग्राफ्स्, प्रोग्रेस ऑफ जॉइंट स्टॉक बँक्स्, असे माहितीपूर्ण ग्राफ्स् प्रदर्शनासाठीं मुद्दाम तयार करून घेतले होते. या ग्राफवरून बँकांची परिस्थिति कालमानाप्रमाणें समजून येत होती.

### नॅशनल सेव्हिंग्ज ब्युरो

राष्ट्रीय बचत योजनेसाठीं 'नॅशनल सेव्हिंग्ज ब्युरो' या खात्यामार्फत सरकारकडून वेळोवेळीं जी प्रसिद्धीपत्रकें, जाहिरातीचे बोर्डस् प्रसिद्ध केलीं जातात त्यांची संकलितें अशीं मांडणी

प्रदर्शनांत केली होती. बँकांचे या प्रदर्शनांत नॅशनल सेव्हिंग्ज ब्युरोनें सहकार्य देऊन व प्रत्यक्ष भाग घेऊन सहानुभूति व्यक्त केली, हें विशेष नमूद करण्यांत आनंद वाटतो.

### इमारतींची मॉडेल्स

पुण्यांतील स्थानिक बँकांपैकीं बँक ऑफ महाराष्ट्र, दि भारत इंडस्ट्रिअल बँक, या बँकांच्या इमारतींचें बांधकाम चालू आहे. या बँकांच्या इमारतींचे फोटो व मॉडेल्स, तसेंच पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. सिटी शाखेचें मॉडेल प्रदर्शनांत मांडण्यांत आलें होतें.

### फोटो आल्बम्स

प्रदर्शनांत सुमारें ४० ते ५० बोर्डस कलात्मक रीतीनें मांडले होते. या बोर्डांचें कायम स्वरूप असोसिएशन कचेरींत ठेवण्याचे दृष्टीनें त्यांतील कांहीं निवडक नमुन्यांचे फोटो काढून ठेवण्यांत आले आहेत. विशेषतः चेक्सचे नमुने, जाहिरातींचे नमुने, मशिनरी विभाग, सेफ डिपॉसिट व्हॉल्ट, होम सेव्हिंग्ज बॉक्सेस यांचे फोटो उत्तम निघाले आहेत.

### बँका—काल, आज व उद्या

बँकिंग प्रदर्शनाची अभिनव कल्पना मूर्त स्वरूपांत रहावी या दृष्टीनें 'बँका—काल, आज व उद्यां' या माहितीपूर्ण पुस्तकाचें संपादन 'अर्थ' चे संपादक श्री. श्री. वा. काळे यांनीं करून त्या पुस्तकाचें प्रकाशन प्रदर्शन-समारंभाचे अध्यक्ष श्री. प्राणलाल देवकरण नानजी यांचे हस्तें करण्यांत आलें. या पुस्तकांत ज्यांनीं प्रदर्शनांतील अनेकविध उपकरणें व साधनें उपलब्ध केलीं व सक्रिय सहानुभूतीहि दाखविली अशा ऋणानुबंधी संस्थांची, बँकांची यादी देण्यांत आली आहे.

### थोरा-मोठ्यांच्या भेटी व देणगी


प्रदर्शन दोन दिवस सर्वत्रांना विनामूल्य खुलें होतें. या दोन दिवसांत अनेक स्त्री-पुरुष हें बँकिंग प्रदर्शन पाहून गेले. प्रदर्शनास भेट दिलेल्या व्यक्तींत रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर श्री. जोशी, रिझर्व्ह बँकेचे डायरेक्टर श्री. वामनराव वर्दे, रिझर्व्ह बँकेचे बँकिंग रिसर्चचे डायरेक्टर श्री. सावकार, युनायटेड बँक ऑफ इंडिया कलकत्त्याचे जनरल मॅनेजर श्री. दत्त व श्री. भट्टाचार्य, प्रा. धनंजयराव गाडगीळ, इंडियन बँक्स असोसिएशनचे डॉ पाणंदीकर, कॉमर्स कॉलेज पुणेंचे प्रिन्सिपॉल श्री. जोशी, डेकन इन्स्टिट्यूट ऑफ कामर्सचे प्रिन्सिपॉल भोपटकर, आदीकरून स्थानिक व परगांवची अशी मंडळी होती. या सर्वांनीं या नवीन उपक्रमाचें स्वागत करून समाधान व्यक्त केलें. बँकिंग प्रदर्शनासारख्या लोकशिक्षण कार्याचें महत्त्व पाहून, श्री. प्राणलाल देवकरण ह्यांनीं २५१ रु. देणगीदाखल दिले, ह्याबद्दल असोसिएशन त्यांची सदैव ऋणीच राहील.

### आलेले संदेश

या अभिनव कल्पनेचें मूर्त स्वरूप ज्यांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहतां येणें शक्य झालें नाहीं त्यांनीं आपल्या शुभेच्छा व यशचिंतन असोसिएशनकडे पाठविलें होतें. एकूण सुमारें २० ते २५ संदेश जे आले त्यांत मुंबई प्रांताचे अर्थमंत्री नामदार जीवराज मेहता, युनायटेड कमर्शिअल बँकेचे जनरल मॅनेजर श्री. बी. टी. ठाकूर, यांचे संदेश विशेष उल्लेखनीय असे होते.

### असोसिएशनचें ब्रीदवाक्य

" Banking is a Great Service and is the Backbone of the Country's Economy." ह्या बोधवाक्याप्रमाणें प्रदर्शन-पुस्तकमाला-पुस्तिकेचें कार्य बँकिंग क्षेत्रांत व देशाचे सेवेंत रुजू व्हावें अशी सदिच्छा प्रदर्शित करून हा बँकिंग प्रदर्शनाचा लेख पुरा करतों.



आपली बचत
प्रभावी शक्ति
निर्माण करील
परंतु
ह्यांकरितां
आपल्या ठेवी
योग्य बँकेत
राहूंद्या.
भांडवल
★ वसूल भांडवल रु.१६,००,०००
★ रिझर्व्ह फंड रु. ५,६५,०००
★ खेळते भांडवल रु.३। कोटींचेवर
दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.
—पुणें २.—
मॅनेजर— चिं. वि. जोग.

पुणें डेक्कन जिमखाना शाखेंतील सेफ डिपॉझिट व्हॉल्टसचा फायदा दूरदर्शी लोक घेत आहेत, आपणहि एक व्हॉल्ट राखून ठेवा.

पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.
११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.
तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११९५
( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )
संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.
★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें; बेंड.
★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें बेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.
★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गावांचे अंक, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.
★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.
★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.
★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

**दिव्यौषधींची स्पर्धा बाधली**—परदेशांतून येणाऱ्या दिव्यौषधींची स्पर्धा बाधल्यामुळें जपानमधील ८,४०० औषधवाल्यांना आपले धंदे बंद करण्याची पाळी आली आहे. जपानमध्यें ६०,००० दिव्यौषधी आणि ४०० जीवनसत्त्वयुक्त औषधें सध्यां विकलीं जात आहेत. जपानच्या देशी औषधांपेक्षा तीं एकतृतीयांशानें स्वस्त असूनसुद्धां मोठ्या शहरांतून फारशी मागणीच नाहीं. त्यामुळें तीं औषधें खेडेगांवांतून फेरीवाल्यांकडून विकण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे.

**जॅक हॉब्स ह्यांनी सत्तरी गांठली**—सुप्रसिद्ध इंग्लिश क्रिकेटपटु जॅक हॉब्स ह्यांना नुकतेंच ७० वें वर्ष लागलें. पहिल्या प्रतीच्या कसोटी सामन्यांत त्यांनीं ६१,००० धांवा काढल्या असून १९७ शतकें काढलीं आहेत. सध्यां ते लंडन येथें खेळाच्या सामानाच्या विक्रीचा व्यवसाय करतात. १९२३ सालीं भारतीय क्रिकेटपटु श्री. रणजितसिंग ह्यांनीं त्यांना एक सोन्याची सिगारेटची पेटी भेट म्हणून दिली होती. ती त्यांनीं अद्याप जतन करून ठेवली आहे.

**मध्यप्रदेशांत पिकांच्या चढाओढी**—मध्यप्रदेश सरकारनें खरीपाच्या हंगामासाठी १५ मे ते १५ जूनपर्यंत आणि रब्बीच्या हंगामासाठी १ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत पिकांच्या चढाओढी लावण्याचें ठरविलें आहे. भात, गहूं, ज्वारी व बटाटे ह्यांचें जास्तींत जास्त पीक काढणाऱ्यांना बक्षिसें देण्यांत येतील.



**यंत्रसाहित्याची आयात**—१९५०-५१ सालीं भारतानें ८४·८० कोटी रुपयांची यंत्र-सामुग्री आयात केली होती. १९५१-५२ सालीं १०४·०६ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री आयात करण्यांत आली.

**टेक्स्टाइल इन्स्टिट्यूटला मदत**—द. भारतीय गिरणीमालक संघानें कोईमतूर येथें 'टेक्सटाइल रिसर्च इन्स्टिट्यूट' काढण्यासाठी भारतीय सरकारकडे खटपट चालविली होती. भारतीय सरकारनें संशोधन केंद्रासाठी २५ लाख रुपये देण्याचें ठरविलें आहे. पैकी ५ लाख रुपयांचा पहिला हप्ता देण्यांत आला.

**बिनतारी यंत्रसाहित्याचा कारखाना**—भारतीय सरकार इलेक्ट्रॉनिक्सचीं उपकरणें तयार करण्याचा एक कारखाना काढण्याच्या खटपटींत आहे. हा कारखाना काढण्याच्या कामीं एका फ्रेंच कंपनीचें साह्य घेण्यांत येणार आहे. संरक्षणखातें व बिनतारी दळणवळण ह्यांना लागणारें साहित्य कारखान्यांत तयार होईल.

**राजस्थान सरकारला कर्ज पाहिजे**—राजस्थान सरकार सध्या पैशाच्या अडचणींत सांपडलें आहे. अडचणींतून बाहेर पडण्यासाठी भारतीय सरकारकडे २·१ कोटी रुपयांचें कर्ज मागण्यांत आल्याचें समजतें. राज्य-सरकारच्या नुकत्याच भरलेल्या बैठकींत कर्ज मागण्याचा निर्णय घेण्यांत आला.


दि व्हल्कन इन्शुअरन्स
कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे
वसंत नं. ३ चरक


" शरद चरक "
उसाचे चरक
अधिक माहिती मागवा.
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.




हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (डे. जि. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.